Vol 6 Issue 6 Dec 2016

ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

## International Advisory Board

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

GRT Golden Research Thoughts

ISSN: 2231-5063 Impact Factor : 4.6052(UIF) Volume - 6 | Issue - 6 | December - 2016

# नव्वदोत्तरी ग्रामीण काव्यसंग्रहांतील पर्यावरणीय भान

प्रा. एन.व्ही. शिंदे
मराठी विभाग, दहिवडी कॉलेज, दहिवडी, ता. माण, , जि. सातारा.



## Introduction : (प्रास्ताविक)–

नव्वदोत्तरी ग्रामीण काव्यामध्ये अनेक अंगांनी अभिव्यक्ती आणि आशय यांच्या अनुषंगाने बदल झाले. जागतिकीकरण, खासगी करण आणि उदारीकरण या धोरणांमुळे या नव्वदोत्तर काव्याचा पाया उभा राहिला. यामधून या कवितेला नवे भान व दृष्टी प्राप्त झाली. यामुळे नव्वदोत्तर ग्रामीण कविता पर्यावरणासह ग्रामीण विश्वावर विश्लेषणात्मक व वास्तववादी बोलते. या काळामधील ग्रामीण कवी सजग बनला. यामध्ये इंद्रजित भालेराव, नारायण सुमंत, केशव सखाराम देशमुख, अजय कांडर, श्रीकांत देशमुख, कैलास दौंड, सदानंद देशमुख, संतोष पद्माकर पवार, ऐश्वर्य पाटेकर आणि कल्पना दुधाळ यांसह अनेक कवी या प्रवाहामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका निभावताना दिसतात. आत्मचिकित्सा, शोषक व्यवस्थेला नकार, आत्मटीका, वास्तवदर्शन विश्लेषण, जागतिकीकरणाचे प्रभाव, शेती व शेतकरी स्थिती, नफेखोर व भांडवली व्यवस्थेमधील राजकारण, भ्रष्ट सहकार व शासन संस्थेचा कारभार, ग्रामजीवन व ग्रामसंस्कृतीची होणारी पडझड, समाज व भाषा यांचा संकर, मानवी अस्तित्वाची निरर्थकता, आत्मकेंद्री वृत्ती, मानवी मूल्यांचा होणारे अवमूल्यन, पर्यावरणाचा व प्राकृतिक व्यवस्थेचा स्वार्थापायी पाडलेला मुडदा आणि त्याचे परिणाम यातून या कवितेचा मार्ग प्रामुख्याने जातो. यातूनच या कवितेचे पृथगात्म दर्शन दिसते. यापैकी नव्वदोत्तर ग्रामीण कवितेने पर्यावरणाच्या अनुषंगाने केलेले चिंतन यावर चर्चा करता येईल.

## Objectives: (उद्दिष्ट्ये)–

नव्वदोत्तर ग्रामीण कवितमधून पर्यावरणाच्या अनुषंगाने येणारे भान व सजगता यांची उकल करणे. सद्यस्थितीच्या शेती व्यवसायामध्ये पर्यावरणाची भूतिका लक्षात घेऊन यामध्ये मांडलेला विचार व दृष्टी समजून घेणे. पर्यावरणाचा वाढता विनाश व त्यामुळे शेतीसह मानवी जीवनावर होणारा दूरगामी परिणाम यांचा आढावा घेऊन समाजभान सजग करणे.

## Main Them of the Research paper: (संशोधनाचा मुख्य भाग)–

नव्वदोत्तर ग्रामीण कविता जागतिकीकरणाच्या प्रभावाची उकल करताना पर्यावरण या अनुषंगाने गांभीर्यपूर्वक विचार व्यक्त करत जाते. हा विचार पर्यावरणीय भान स्पष्ट करतो. पर्यावरणाच्या वाढत्या विनाशामुळे निर्माण होणारे प्रश्न किती गंभीर व मानवी भविष्यावर दूरगामी परिणाम करणारे आहेत; याचेही भान ही कविता देते. नव्वदोत्तर ग्रामीण कविता आत्मटीकाही करते. ती तटस्थपणे सर्वांगी समाजव्यवस्थेचे मूल्यमापन करू पाहते. यामध्ये पर्यावरणाच्या हानीला जबाबदार असलेल्या सर्वच घटकांवर ती भाष्य करते. टीका करते. पर्यावरण संरक्षणाचा देखावा करणाऱ्या घटकांबद्दल तीव्र शब्दांत निषेध नोंदविते. त्यांना ठाम विरोध करते. इंद्रजित भालेराव यांच्या 'भूमीचे मार्दव' या कवितासंग्रहामधून पर्यावरण, निसर्ग यांचा समृद्ध वारसा चित्रित झालेला दिसतो. त्यामधील विविधता पहावयास मिळते. निसर्गाची संपन्नता आणि समृद्धी याचे भान त्यांची कविता देते. शिवारामध्ये उगविणारे गवत हे फक्त गवत नसून त्याचे अस्तित्व, त्याचा स्वतंत्र परिवेश त्यांनी लक्षात आणून दिला. भूमीतून उगवणारा प्रत्येक जीव स्वतंत्र आहे. त्याचे विविध रूपांतील अस्तित्व निसर्गाला सुंदर करते. ती सुंदरता मानवाने जपली पाहिजे, असा सूर त्यांची कविता आळविते. औद्योगिकीकरण, जागतिकीकरण यांच्या प्रभावाच्या काळात निसर्ग, पर्यावरण आणि मानवी जीवन यांचा विचार ही कविता सखोलपणे मांडते. माती, शिवार, वृक्ष, पशु–पक्षी, प्राणी, पिक–पाणी या पर्यावरणाच्या प्रत्येक घटकांवर सजगतेने कवी भाष्य करतात. मातीबद्दलची ओढ, जिव्हाळा, तिचे उपकार ही कविता विसरत नाही. म्हणून कवी इंद्रजित भालेराव म्हणतात,

कवितांना सजवणाऱ्या
प्रतिमांपुरता
केला नाही मी तुझा फक्त वापर
माती माय

पशु–पक्षी यांच्याबद्दला जिव्हाळा व आपुलकीची भावनाही ही कविता व्यक्त करत राहते. विशेषतः नव्वदनंतरच्या कवितेमध्ये सद्यस्थितीच्या पर्यावरणाचा अनेकांगी विचार होत आहे. गावाच्या स्थितीपासून निसर्गाचे बदलते रूप, दुष्काळ, रोगराई, अतिवृष्टी, पाऊसमान, वादळ–वारे अशा अनेक घटकांची चर्चा ही कविता करते. यातून या कवितेमधील पर्यावरणीय भान दिसते. यादृष्टीने इंद्रजित भालेरावांच्या 'टाहो' या कवितासंग्रहातील 'माती–पाणी' या अंतर्गत असलेल्या कवितांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. निसर्गाच्या अनुकूल साथीची गरज वारंवार या कवितांमधून व्यक्त होत राहते. त्याचबरोबर निसर्गाच्या अवकृपेला कारणीभूत ठरणाऱ्या घटकांचाही या कवितेत विचार येतो. नारायण सुमंत यांच्या 'वृक्षवेद', 'सातबारा' या कवितासंग्रहांमधून देखील पर्यावरणीय भान व्यक्त होते. विशेषतः या कवितांमधून पर्यावरण, नैसर्गिक स्थिती यांच्या अवनतीला जबाबदार असलेल्या सर्वच घटकांचा तीव्र शब्दांत समाचार घेतला आहे. 'वृक्षवेद'

यामध्ये वृक्षांची नानाविध रूपे, वृक्ष आणि माणूस यांचा अनुबंध, वृक्षाचे उपयोग, त्याचे मानवी जीवनामधील अढळ स्थान, त्यांचे स्वयंभू अस्तित्व याशिवाय त्यांच्या स्वयंभू अस्तित्वावर मानवाने केलेला हल्ला, त्यांच्यावरील अन्याय याचे चित्रण येते. झाडांचे नैसगिक जगणे माणसाने कृत्रिम बनविले. त्यांना आपल्या कैदेत ठेवण्याचा प्रयत्न केला. म्हणूनच वृक्षांची भावना मांडताना कवी वृक्षांना मानवी रूप देतात, आणि म्हणतात,

आता प्रत्येक आघाडीवर
मोर्चेबंद असतील झाडे
प्रत्येक शिबंदी आणि रसद
तोडून टाकतील खोडे
लेकरासाठीही आता
पान्हावणार नाहीत झाडे
हळव्या नाजुक ओठांसाठीही
फळे, देणार नाहीत झाडे
तमाम ओठांच्या भुकेचा प्रश्न
आता खिंडित धरणार आहेत झाडे

यावरून निसर्गाची भूमिका कशी आहे, याचे भान देण्याचा प्रयत्न कवी करतात. त्यांच्या 'सातबारा' या काव्यसंग्रहामध्येही कुणब्यांचा आकांत मांडताना, त्यांच्या अवनतीला, ऱ्हासाला कारणीभूत असलेला महत्त्वपूर्ण घटक म्हणजे पर्यावरण. आणि या पर्यावरणाचा ऱ्हास मानवाने आपल्या हरेएक कृत्यांमधून घडवून आणला. याची चीड, विद्रोह तर कधीकधी आत्मटीका व्यक्त होते. विविध प्रकारचे संशोधन, हरितक्रांत्या, रासायनिक प्रयोग यांच्या नावाखाली निसर्गाची शोषण मानवाने केले. निसर्गाची स्वतंत्र वाट माणसाने काबूत ठेवण्याचा प्रयत्न केला. याचेच परिणाम आज मनुष्य जमात भोगत आहे. तसेच यापुढे यापेक्षाही वाईट भोग मानवजातीच्या नशिबी आहेत, याचे सूचन या कवितांमधून मिळते.

श्रीकांत देशमुख यांच्या 'बळिवंत', 'बोलावें ते आम्ही..' या कवितासंग्रहांमधून पर्यावरणाविषयीचे भान पहावयास मिळते. या कवितांमधून पर्यावरणाच्या दोन बाजू प्रकर्षान जाणवतात. 'बळिवंत' मधून समृद्ध असलेला निसर्ग, निसर्गाशी मैत्री करून त्याच्या साथीने जगणारा कुणबी प्रामुख्याने दिसतो. तर 'बोलावें ते आम्ही..' यामधून सद्यस्थितीला होणारा निसर्गाचा ऱ्हास आणि एकूणच मानवी जीवनाचा झालेला सर्वच क्षेत्रांतील ऱ्हास व्यक्त होतो. कल्पना दुधाळ यांच्या 'सिझर कर म्हणतेय माती' या कवितासंग्रहामध्ये पर्यावरणाचा सखोल विचार येतो. हा विचार वरवरचा नसून पर्यावरणाची होळी माणूस कसा खेळतो आहे, याचे पदोपदी भान देणारी ही कविता आहे. निसर्गाच्या सृजनतेला नख लावू पाहणाऱ्या मनुष्य धर्माची स्थिती मांडली आहे. आभाळ, ढग, माती अशा सृष्टीच्या मूलभूत गोष्टींवर मनुष्य आक्रमण करू लागला आहे. म्हणून कवयित्री सांगतात,

घाटेअळीनं आतून घाटा पोखरल्यासारखं
पोकळं झालंय आभाळ
खुडलेत सगळयाच ढगांचे शेंडे तुडतुडयांनी
टेकलेल्या क्षितिजाच्या मुळया
खाऊन टाकल्यात उमणीनं
माझ्या फुफ्फुसांत जंतूसंसर्ग होण्याआधी
साऱ्या विश्वालाच पेस्ट कंट्रोल करायला निघालोय मी

म्हणूनच ही माती सिझर करण्याकरिता आडून बसली आहे. ही निसर्ग, पर्यावरणाची अवस्था आपण केली असेल तर, मानवी अधःपतनाची नांदी येथेच सुरू होते. याचे सूचन ही कविता देते.

कवी संतोष पद्माकर पवार यांच्या 'पिढीपेस्तर प्यादेमात' या कवितासंग्रहांमधूनही पर्यावरणाची सजग दृष्टी अनुभवयास मिळते. कुणब्यांच्या जीवनाची पिढयान्पिढया होणारी ससेहोलपट ही फक्त निसर्गाच्या अवकृपेमुळे झाली आहे. आणि निसर्गाची अवकृपा घडवून आणण्यामध्ये कुणब्यासह, राजकारणी, तकलादू निसर्गरक्षक, भ्रष्टाचार, स्वार्थी व चंगळवृत्ती कारणीभूत आहे. कमी कष्ट व जास्त उत्पन्न, जास्त पैसा मिळविण्याच्या हव्यासापोटी माणसाने सुंदर व समृद्ध असणारा निसर्ग ओरबडला. नैसर्गिक प्रकृतीचा मुडदा पाडला. त्यामुळे त्याचे विपरित परिणाम सर्वांना सोसावे लागत आहे. कवी याविषयी म्हणतात,

पावसापाण्याचे गणित शोधून करीत
राहिलास गाळपेर; वेळ साधून नद्या हटवून
आणि पाडलास मुडदा तू एका
प्राकृतिक व्यवस्थेचा.........
......केलास सुरू सृष्टीवर अनन्वित अत्याचार
की त्याचा झाला नाही अजून कुठल्या ठाण्यात रिपोर्ट
हा तुझा सृजनाच्या मातीवर
प्रयोग नाही बलात्कार आहे बलात्कार.....
.....तू गुलाम केलंस हवा पाण्याला, माणसाला
गाय, बैल, शेळया खेचरं, कोंबडया, घोडयांना.
या साऱ्यांनी तुलाच जुंपलंय आता घाण्याला

अशी अवस्था मनुष्याने स्व स्वार्थापायी पर्यावरणाची केली. किमान हे भान तरी मनुष्याला इथून पुढची नवी दिशा दाखवेल, अशी आशा आहे.

केशव सखाराम देशमुख यांच्या 'अथक' आणि सदानंद देशमुख यांच्या 'गावकळा' या काव्यसंग्रहांमधून देखील पर्यावरणाचे भान दिसते.

 Volume - 6 | Issue - 6 | December - 2016

एकेकाळी समृद्ध, स्वयंपूर्ण असलेल्या निसर्गाची हानी कशी होत गेली. त्यातून कृषिवलांच्या वाटयाला अथक कष्ट कसे आले, गावांची वाढती कळा यामधून दिसते. पिढयान्पिढया श्रम करूनही श्रमाला मोल नाही. स्वाभिमानाचं जगणं कृषिवलांच्या नशिबी नाही. हे मिळविण्यासाठी निसर्गाची मोलाची साथ महत्त्वाची असून ती न मिळण्याची कारणे ही कविता शोधते. निसर्ग, खेडी, मनुष्य जीवन यांच्यामधील बदलांची सजग दखल घेणारी ही कविता आहे.

नव्वदोत्तरी ग्रामीण कवितांमध्ये अनेक कवींनी आपल्या लेखनीमधून पर्यावरणीय दृष्टीकोन व्यक्त केला आहे. मुळात पर्यावरणाच्या भोवताली रमणारी, पर्यावरणाशी गूजगोष्टी करणारी ही कविता आहे.

## Conclusions: *(निष्कर्ष)*–

नव्वदनंतरच्या ग्रामीण कवितासंग्रहांमधून पर्यावरणाचे भान लक्षात घेतल्यानंतर या काव्यामधील पर्यावरण संरक्षण, त्याचे संवर्धन आणि पर्यावरण विनाशाला कारणीभूत असलेले घटक यांच्या बद्दलची भूमिका स्पष्ट होते. या कवितांच्या केंद्रस्थानी जरी कुणबी जीवन, कृषक व्यवस्था असली तरी, या कृषक व्यवस्थेच्या, कुणबी जीवनाच्या अवनतीला जबाबदार असलेल्या घटकांविषयी ठाम भूमिका ही कविता घेते. यातून मग ही कविता कधी विद्रोहाचा मार्ग स्वीकारते तर कधी आत्मटीकेचा. पण पर्यावरणाला, निसर्गाला अनवतीच्या मार्गला नेणाऱ्या सर्वच घटकांबद्दलाचा समाचार ती घेते. एकूणच पर्यावरणीय भान या कवितेचे सजग व सूक्ष्म असून यामधून मानवी जीवनाला, पर्यावरण रक्षणाला योग्य दिशा मिळेल.

## References: *(संदर्भ सूची)*–


1.भूमीचे मार्दव, इंद्रजित भालेराव, मनोविकास प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती 2011
2.पेरा, इंद्रजित भालेराव, जनशक्ती वाचक चळवळ, औरंगाबाद, तृतीयावृत्ती 2010
3.टाहो, इंद्रजित भालेराव, प्रतिभास प्रकाशन, परभणी, तिसरी आवृत्ती 2008
4.वृक्षवेद, नारायण सुमंत, उत्कर्ष प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती 1993
5.सातबारा, नारायण सुमंत, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती 2005
6.बळिवंत, श्रीकांत देशमुख, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, तिसरी आवृत्ती 2006
7.सिझर कर म्हणतेय माती, कल्पना दुधाळ, हर्मिस प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती 2014
8.पिढीपेस्तर प्यादेमात, संतोष पद्माकर पवार, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती 2008
9.अथक, केशव सखाराम देशमुख, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती 2010




*प्रा. एन.व्ही. शिंदे*
*मराठी विभाग, दहिवडी कॉलेज, दहिवडी, ता. माण, , जि. सातारा.*

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org